***मंत्रिमंडळ निर्णय :** दिनांक : १३ जुलै, २०११

मुंबई, दि. १३ : राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

## दोन साखर कारखान्यांमधील हवाई अंतर १५ कि.मी. ऐवजी २५ कि. मी. करण्याचा निर्णय

राज्यातील दोन साखर कारखान्यांतील किमान अंतर १५ कि.मी. ऐवजी २५ कि.मी. करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

राज्यात सहकारी तत्वावरील उभारणी पूर्ण झालेले १६३ आणि ४२ खाजगी असे एकूण २०५ साखर कारखाने आहेत. केंद्र शासनाच्या ग्राहक संरक्षण, अन्नधान्य आणि सार्वजनिक वितरण विभागाने जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३ नुसार प्राप्त झालेल्या अधिकारात दि.१० नोव्हेंबर २००६ रोजी ऊस नियंत्रण आदेश (सुधारणा) २००६ रोजी निर्गमित केले आहेत. या आदेशातील कलम ६ (अ) मधील तरतुदीनुसार अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्यांच्या १५ कि.मी. त्रिज्येत नवीन साखर कारखान्याची उभारणी करता येणार नाही. राज्य शासनास सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून आवश्यक व इष्ट वाटल्यास २ साखर कारखान्यांमधील किमान अंतर १५ कि.मी. पेक्षा जास्त केंद्र शासनाच्या पूर्व मान्यतेनुसार अधिसूचित करु शकेल किंवा १५ कि.मी. पेक्षा कमी नाही, अशा मर्यादेत वेगवेगळ्या विभागासाठी वेगवेगळे किमान अंतर अधिसूचित करु शकेल.

हवाई अंतर घेतलेल्या जवळपास १०० कारखान्यांनी प्रकल्पाची उभारणी केल्यास राज्यातील साखर कारखान्यांची संख्या ३०० च्या वर पोहोचेल. अशा परिस्थितीत राज्यातील अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्यांच्या गाळप क्षमतेचा पुरेपूर वापर होणार नाही आणि उभारणी झालेले सर्व कारखाने आर्थिकदृष्ट्या अडचणीत येणार आहेत. ऊस उत्पादकांना हमीभाव देता येणे कारखान्यांना शक्य होणार नाही. अशा परिस्थितीत ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील तरतुदीनुसार राज्यातील २ साखर कारखान्यांतील किमान अंतर १५ कि.मी. पेक्षा जास्त वाढविणे गरजेचे झाले आहे.

-----o-----

## सवलतीच्या दराने पामतेल वितरित करण्याचा निर्णय

केंद्र शासनाच्या अर्थसहायाने सवलतीच्या दराने पामतेल वितरीत करण्याच्या योजनेखाली लाभार्थ्यांना ४५ रुपये प्रति लिटर या दराने पामतेल वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यात ही योजना ऑगस्ट २००९ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत ऑगस्ट, २००९ ते मार्च, २०११ या कालावधीत ९४,१७४ मे.ट. पामतेल वितरीत करण्यात आले आहे. त्यासाठी राज्य शासनाने ६८ कोटी रुपये एवढा आर्थिक भार उचलला आहे.

केंद्र शासनाने प्रस्तुत योजनेस सप्टेंबर,२०११ पर्यंत मुदतवाढ दिली असून राज्यास ८७,७४० मे. ट. पामतेल मंजूर केले आहे.

केंद्र शासनाने मंजूर केलेले पामतेल जुलै, २०११ ते सप्टेबर, २०११ या कालावधीत आयात केले जाणार असून सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नपुर्णा/अंत्योदय/बीपीएल आणि एपीएल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना दरमहा प्रतिशिधापत्रिका एक लिटर याप्रमाणे जुलै ते डिसेंबर, २०११ या कालावधीत वितरीत करण्यात येणार आहे.

या योजनेच्या अनुषंगाने पामतेलाचे वितरण करण्याकरिता दरमहा सुमारे ७४ कोटी रुपये याप्रमाणे सहा महिन्यांच्या कालावधीकरिता एकूण ४४४ कोटी रुपये एवढा भांडवली खर्च अपेक्षित आहे. दरमहा १.९० कोटी रुपये याप्रमाणे सहा महिन्यांच्या कालावधीकरिता ११.४० कोटी रुपये  एवढा आर्थिक भार अनुदान म्हणून शासनास सोसावा लागणार आहे.

-----o----

## महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या नावात बदल

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना ही यापुढे **'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र'** या नावाने ओळखली जाणार आहे. मात्र, राज्य शासनाच्या (राज्य निधीतील) वैयक्तिक लाभाच्या योजना या पूर्वीप्रमाणे 'रोजगार हमी  योजना' नावाने सुरु ठेवण्यात येतील असा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सुधारणा २००६) अन्वये राज्यामध्ये केंद्र शासनाकडून अर्थसहायीत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) व राज्याची अर्थसहायीत रोजगार हमी योजना (रोहयो) अशा दोन योजना सुरु आहेत.

केंद्र शासनाने सन २००९ मध्ये अधिनियमामध्ये सुधारणा करुन या अधिनियमाचे नाव 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम' असे केले आहे. या अधिनियमांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या निधीतून राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेला 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' व त्यानंतर संबधित राज्याचे नाव असे संबोधण्यात यावे, अशा सूचना केल्या आहेत.

-------o-------

## राज्यात सरासरी ३६०.७ मि.मीटर पाऊस
## आतापर्यंत ४७.७५ लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी

राज्यात कोकण, मराठवाड्यातील बहुतांश भागात आणि पश्चिम विदर्भातील काही भागात जोरदार पावसाची तर राज्याच्या उर्वरित भागात मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.  राज्यातील खानदेश, पश्चिम महाराष्ट्रातील आणि मराठवाड्यातील काही भागात अद्यापही पावसाचे प्रमाण कमी आहे.

राज्यात आतापर्यंत सरासरी ३६०.७ मि.मी. पावसाची नोंद झाली असून सरासरीच्या तुलनेत ८६.९ टक्के पाऊस झाला आहे. सातारा जिल्ह्यात १२० टक्क्यांहून अधिक पाऊस झाला असून रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, बीड आणि कोल्हापूर जिल्ह्यात १०० ते १२० टक्के पाऊस झाला आहे.  ठाणे, रायगड, अहमदनगर, सोलापूर, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यात ८० ते १०० टक्के, नाशिक, नंदूरबार, सांगली, औरंगाबाद, जालना, नांदेड, परभणी, अमरावती, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या ११ जिल्ह्यात ६० ते ८० टक्के तर धुळे, लातूर, उस्मानाबाद, नागपूर, भंडारा आणि गोंदिया या ६ जिल्ह्यात ४० ते ६० टक्के एवढा पाऊस झाला आहे.

राज्यात आतापर्यंत पर्जन्यमान सरासरीच्या तुलनेत एकूण ३५५ तालुक्यांपैकी २ तालुक्यात २० टक्क्यांपेक्षा कमी, २४ तालुक्यात २० ते ४० टक्के, ७८ तालुक्यात ४० ते ६० टक्के, ९५ तालुक्यात ६० ते ८० टक्के, ८२ तालुक्यात ८० ते १०० टक्के आणि ७४ तालुक्यात १०० टक्क्यांपेक्षा अधिक झाले आहे.

**राज्यात ३६ टक्के क्षेत्रात पेरणी :**

राज्यातील खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १३२.३४ लाख हेक्टर असून आतापर्यंत ४७.७५ लाख हेक्टर म्हणजेच एकूण क्षेत्राच्या ३६ टक्के क्षेत्रात पेरणी झाली आहे.

कोकण, कोल्हापूर, पुणे आणि नागपूर विभागात भात रोपवाटिकेवर रोपे वाढीच्या अवस्थेत असून भात लागवडीची कामे सुरु आहेत. कोल्हापूर, पुणे विभागात सोयाबीन, भुईमूग, बाजरी आणि ज्वारी पिकांच्या तर लातूर, अमरावती आणि नाशिक विभागात मूग, उडीद, ज्वारी, सोयाबीन, तूर आणि कापूस पिकांच्या तसेच नागपूर विभागात कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांच्या पेरण्या प्रगतीपथावर आहेत.

नाशिक, पुणे आणि लातूर विभागातील काही भागात अद्यापही खरीप पिकांच्या पेरणीस पुरेसा पाऊस झालेला नाही.

चालू वर्षी ४६.३५ लाख मेट्रिक टन खताची केंद्र शासनाकडे मागणी केली होती. प्रत्यक्षात ४३ लाख मेट्रिक टन खत साठा मंजूर करण्यात आला. सध्या खताची पुरेशी उपलब्धता आहे.

एकूण बियाण्यांची गरज १८.३५ लाख क्विंटल असून एकूण उपलब्धता २०.५७ लाख क्विंटल आहे. आतापर्यंत १६.९६ लाख क्विंटल बियाण्यांचा पुरवठा झाला आहे.

-----o-----

**राज्यात चालूवर्षी विक्रमी म्हणजेच**
**आतापर्यंत ११,२०९ द. ल. घ. मी. पाणी साठा**

राज्यात आतापर्यंत झालेल्या पावसाने मोठ्या, मध्यम व लघुपाटबंधारे प्रकल्पांमध्ये ३१ टक्के म्हणजेच ११,२०९ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा झाला आहे. गतवर्षी याच तारखेला राज्यात ८,४५३ दशलक्ष घनमीटर म्हणजेच २३ टक्के एवढा पाणीसाठा झाला होता. २००९ मध्ये याच तारखेला राज्यात पाणीसाठ्याची टक्केवारी १४ टक्के म्हणजेच ५,०४९ दशलक्ष घनमीटर होती. गेल्या ३ वर्षाचा तुलनात्मक अभ्यास केल्यास चालू वर्षी राज्यात विक्रमी पाणीसाठ्याची नोंद झाली आहे.

कोकणातील प्रकल्पांमध्ये ६३ टक्के, मराठवाडा २४ टक्के, नागपूर २८ टक्के, अमरावती ३० टक्के, नाशिक १८ टक्के, पुणे ३३ टक्के अशी पाणीसाठ्याची टक्केवारी आहे.

राज्यात एकूण ८३ मोठे प्रकल्प, २२२ मध्यम प्रकल्प, २११० लघुप्रकल्प आणि १४ इतर धरणे आहेत. मोठ्या प्रकल्पांची प्रकल्पीय क्षमता २१,२८१ दशलक्ष घनमीटर असून आतापर्यंत ६,६१५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा झाला आहे. मध्यम प्रकल्पांची प्रकल्पीय क्षमता ४,७८८ दशलक्ष घनमीटर असून आतापर्यंत १,४९३ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा झाला आहे. तर लघुप्रकल्पांची प्रकल्पीय क्षमता ४,५२० दशलक्ष घनमीटर असून आतापर्यंत ८९८ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा झाला आहे. याशिवाय इतर धरणांमध्ये २,२०३ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा झाला आहे.

-----o-----